माहिती हवीय?

विलास नंदकुमार सातपुते, इचलकरंजी.

□ *लाल पत्थर, प्रेम पर्वत, किस्मत, दो राह, नतीजा, दो यार, त्रिमूर्ती, दिल दिवाना* हे चित्रपट केव्हा पडद्यावर आले? निर्माता-दिग्दर्शक, संगीतकार व नायक-नायिका कोण?

— *लाल पत्थर* १९७१मध्ये पडद्यावर आला होता. निर्माता: एफ. सी. मेहरा, दिग्दर्शक सुशील मजुमदार, संगीतकार: शंकर-जयकिशन, नायक-नायिका: राजकुमार, विनोद मेहरा, हेमामालिनी, राखी. *प्रेम पर्वत* १९७३मध्ये पडद्यावर आला होता. निर्माता: शांती सागर, दिग्दर्शक: वेद राही, संगीतकार: जयदेव, नायक-नायिका: सतीश कौल, रेहाना सुलतान. *किस्मत* या नावाचा चित्रपट सहा वेळा पडद्यावर आलाय. पहिला *किस्मत* मूकपट जमान्यात १९३२मध्ये आला होता. निर्माता, महाराष्ट्र फिल्म कंपनी. दिग्दर्शक: बाबूराव पटेल, नायक-नायिका: दास-सुनीताखान. बोलपट युगातला पहिला *किस्मत* १९४३मध्ये. निर्माता: बॉम्बे टॉकीज, दिग्दर्शक: ग्यान मुखर्जी, संगीत: अनिल विश्वास, नायक-नायिका: अशोककुमार, मुमताज शांती. दुसरा *किस्मत* १९५मध्ये. निर्माता: स्टार एण्ड प्रॉडक्शन. दिग्दर्शक: नानाभाई भट्ट. संगीत: चित्रगुप्त, नायक-नायिका: रंजन कंवल. तिसरा *किस्मत* १९६८मध्ये निर्माता, प्राईड ऑफ एशिया फिल्म्स्. दिग्दर्शक मनमोहन देसाई. संगीत ओ.पी. नय्यर. नायक-नायिका: विश्वजित-बबिता. चौथा *किस्मत* १९८०मध्ये निर्माता: यश कोहली. दिग्दर्शक: भीष्म कोहली. संगीत: भप्पी लाहिरी. नायक-नायिका: मिथुन चक्रवर्ती, रंजिता. पाचवा *किस्मत* १९९५मध्ये. निर्माता-दिग्दर्शक: हरमेश मल्होत्रा. संगीतकार: आनंद-मिलिंद. नायक-नायिका: गोविंदा, ममता कुलकर्णी. *दो राह* नावाचा चित्रपट दोनदा आला. पहिला १९५२मध्ये निर्माता: प्रोग्रेसिव्ह पिक्चर्स. दिग्दर्शक: बाल छाबरा. संगीत: अनिल विश्वास. नायक-नायिका: शेखर, नलिनी जयवंत. दुसरा *दो राह* १९७१मध्ये निर्माता: राम दयाल. दिग्दर्शक: पी.डी. शेणॉय. संगीत: सपन चक्रवर्ती. नायक-नायिका: अनिल धवन, राधा सलूजा. *नतीजा* नावाचा चित्रपट दोनदा आला. पहिला १९४७मध्ये. निर्माता: बॉम्बे टॉकीज. दिग्दर्शक: नजम नकवी. संगीत: रशीद अेग. नायक-नायिका: याकूब-शमिम. दुसरा *नतीजा* १९६९मध्ये. निर्माता: जुगल किशोर. दिग्दर्शक: राजेश नंदा. संगीत: उषा खन्ना. नायक-नायिका: विनोद खन्ना, बिंदू. दो यार १९७२मध्ये. निर्माता-दिग्दर्शक: केवल मिश्रा. संगीत: सोनिक-ओमी. नायक-नायिका: विनोद खन्ना, रेखा. *त्रिमूर्ती* दोनदा. १९७४मध्ये पहिला. निर्माता-दिग्दर्शक: राजेंद्र भाटिया. संगीत: आर.डी. बर्मन. नायक-नायिका: संजय खान, परवीन बाबी. दुसरा १९९५मध्ये. निर्माता: सुभाष घई. दिग्दर्शक: मुकुल आनंद. संगीत: लक्ष्मीकांत-प्यारेलाल. *दिल दिवाना* १९७४मध्ये. निर्माता: रमेश बहल. दिग्दर्शक: नरेंद्र बेदी. संगीत: आर.डी. बर्मन. नायक-नायिका: रणधीर कपूर, जया भादुरी.

सौ. सुधा अ. कोर्टीकर, पंढरपूर.

□ रंजना व रवींद्र महाजनी यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केल्या?



झुंज चित्रपटात रवींद्र महाजनी आणि रंजना

— *झुंज, लक्ष्मी, दुनिया करी सलाम, ग्यानबाची मेख, हळदीकुंकू, हीच खरी दौलत, सावज, सुळावरची पोळी, देवघर, लक्ष्मीची पाऊले, मुंबईचा फौजदार.*

रघुनाथ अप्पाराव पाटील, बोळेगाव.

□ अभिनेत्री बिंदू विवाहित आहे काय?

— होय. चित्रपट व्यवसायात येण्याच्या आधीपासून ती विवाहित आहे. तिचे पती चंपक जव्हेरी यांचा जाहिरातीचा व्यवसाय आहे.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ राज खोसलानी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता? त्यांचे यशस्वी चित्रपट कोणकोणते?

— १९५५चा *मिलाप* राज खोसलानी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट. *सी. आय. डी., सोलवा साल, एक मुसाफिर एक हसीना, काला पानी, बम्बई का बाबू, मेरा साया, दो रास्ते, मेरा गाव मेरा देश, मैं तुलसी तेरे अंगन की* हे त्यांचे यशस्वी चित्रपट.

□ लेखक विश्राम बेडेकर दिग्दर्शक होते की नायक?

— बेडेकर लेखक व दिग्दर्शक होते. १९७५चें *सत्याचे प्रयोग* व *ठकीचे लग्न* या चित्रपटाद्वारा त्यांनी मराठीत विनोदी चित्रपटांचा पाया घातला. *पहिला पाळणा, पैसा बोलतो आहे, लाखारानी, तलाश, वासुदेव बळवंत, रुस्तुम सोहराब, एक नन्ही मुन्नी लडकी* यासारखे काही हिंदी-मराठी चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले.

□ राजा परांजपे यांनी कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?

— *सावकारी पाश, प्रतिभा, कान्होपात्रा, माझा मुलगा, गोरखनाथ, सुनकाई, तुझाच, पुंडलिक, सासुरवास, जिवाचा सखा, जागा भाड्याने देणे आहे, जरा जपून, पुढचं पाऊल, वर पाहिजे, जशास तसे, अखेर जमलं, लाखाची गोष्ट, पेडगावचे शहाणे, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी, बोलविता धनी, इन मिन साडेतीन, ऊनपाऊस, पुरुषाची जात, जगाच्या पाठीवर, आधी कळस मग पाया, सुवासिनी, बायकोचा भाऊ, क्षण आला भाग्याचा, सोनियाची पाऊले, ओवाळणी, बायको माहेरी जाते, हा माझा मार्ग एकला, ते माझे घर, गुरुकिल्ली, काका मला वाचवा, मधुचंद्र, संथ वाहते कृष्णामाई, प्रीत शिकवा मला, येथे शहाणे राहतात, आधार, अपराध, तिथे नांदते लक्ष्मी, नसती उठाठेव, वऱ्हाडी आणि वाजंत्री, प्रीत तुझी माझी, या सुखानो या, बंदिनी, चाचा चौधरी, जल बीन मछली नृत्य बीन बिजली* या चित्रपटात.

भरत चंद्रकांत कालुवाला, माहिम कॉजवे, मुंबई.

□ चित्रगुप्तनी कोणकोणत्या चित्रपटांना संगीत दिलंय?

— चित्रपट अनेक आहेत. जागेअभावी त्या सर्वांची नावे येथे देता येणार नाहीत. पण त्यांच्या काही प्रमुख चित्रपटांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. *सिंदबाद द सेलर, नागपंचमी, अलीबाबा और चालीस चोर, बसंत पंचमी, कल हमारा है, भाभी, काली टोपी लाल रुमाल, कंगन, गेस्ट हाऊस, बरखा, चांद मेरे आजा, नाचे नागिन बाजे बीन, माँ बाप, ऑपेरा हाऊस, जबक, वर्मा रोड, मैं चूप रहूंगी, काबलीखान, पतंग, गंगा की लहरे आकाशदीप*, एक राज भोजपुरी भाषेतला पहिला चित्रपट *गंगा मैया तेहि पियरी चढईबां*.●